दि ओरिएण्टल इंश्योरेंस कम्पनी लिमिटेड
(भारत सरकार का उपक्रम)
पुणे मंडलीय कार्यालय क्र. ३ : ३२१/ए/२, ओसवाल बंधु समाज इमारत
जे. एन. मार्ग, हॉटेल सेव्हनलव्हज के सामने, पुणे - ४११ ०४२.
दुरभाष ०२०- २६४५०३८२, २६४५३०३४
फॅक्स : ०२० - २६४५०८०२

THE ORIENTAL INSURANCE COMPANY LTD.
(A Govt. of India Undertaking)
Pune Divisional Off. No. 3 : 321/A/2, Oswal Bandhu Samaj Building,
J. N. Road, Opp. Seven Loves Hotel, Pune - 411042.
Tel. : 020-26450382 / 26453034 Fax : 020-26450802
E-mail : 163500@orientalinsurance.co.in

CIN : "U66010DL1947GOI007158"

ईमेल-ketki.sindekar@orientalinsurance.co.

फोन - 02026453034 02026450382

दिनांक - 10 मे 2016

**महानिर्मिती, महापारेषण, महावितरण व म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी या कंपन्यातील, 1 जानेवारी 2016 पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन (Tailormade )Floater Group Mediclaim इन्शुरेंस पॉलिसी उपलब्ध करण्याबाबत**

---

म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी अंतर्गत तिन्ही कंपन्यातील सेवानिवृत्त झालेल्या 70 वर्षापर्यंतच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी mediclaim योजना सुरू करण्याची मागणी विविध संघटनांमार्फत व्यवस्थापना कड़े करण्यात आली होती.

त्यानुसार, दि ओरिएंटल इन्शुरेंस कंपनी लिमिटेड पुणे , या विमा कंपनी मार्फत सर्व वीज कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी नवीन Tailormade floater Group Mediclaim Insurance Policy सुरू करण्यात येत आहे. मागील वर्षी सेवानिवृत्त कर्मचार्यांकडून या योजनेसाठी अल्प प्रतिसाद मिळाल्यामुले सदर योजना कार्यान्वित करण्यात आलेली नव्हती.

महानिर्मिती, महापारेषण, महावितरण व म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी या कंपन्यातील, 70 वर्षापर्यंतच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तावित असलेल्या Tailormade Floater Group Mediclaim Insurance policy ची काही महत्त्वाची वैशिष्ठ्ये खालील प्रमाणे आहेत.

- सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी असणा-या या योजनेचा कालावधी एक वर्षाचा असून त्याचा हप्ता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी दि ओरिएंटल इन्शुरेंस कंपनी लिमिटेड पुणे याच्याकडे स्वतः भरणा करावयाचा आहे.
- सदर पॉलिसी चा कालावधि 01.07.2016 ते 30.06.2017 च्या मध्यरात्री पर्यंत असा एक वर्षाचा राहील.
- सदर पॉलिसी चा लाभ तिन्ही वीज कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घेता येईल. तथापी पॉलिसी घेताना कर्मचाऱ्यांचे वय वर्षे 70 पेक्षा जास्त नसावे.

- सदर पॉलिसीसाठी पूर्व वैद्यकीय चाचणी ची आवश्यकता नाही .
- MD India कंपनी (TPA) च्या नेटवर्क रुग्णालयांमध्ये उपचार घेतल्यास कॅशलेस सुविधा उपलब्ध आहे .तसेच, विना नेटवर्क रुग्णालयांमध्ये उपचार घेतल्यास विमा योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय प्रतिपूर्तिची (reimbursement) सुविधा देखील उपलब्ध आहे
- सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सध्या असलेल्या आजाराचा समावेश या योजनेत करण्यात आलेला आहे. (pre-existing) तसेच योजनेत सहभाग घेतल्यापासून च्या पहिल्या 30 दिवसातील आजार व पहिल्या 2 वर्षांसाठी वगळण्यात येणा-या आजारांचा देखील समावेश या योजनेत करण्यात आला आहे.
- सदर योजना Floater तत्वावर आधारित असून याकरिता कुटुंबाची मर्यादा 1+1 असेल म्हणजेच सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे पति/पत्नी यांचा समावेश असेल.
- सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या अवलंबित पति/पत्नी साठी रु. 1 ते 3 लाखांपर्यंत संयुक्त विमा रकमेसाठी विम्याचा हप्ता सेवा करासह खालील प्रमाणे राहील (या पॉलिसी चा विमा हप्ता वर्तमान बाजार मूल्या पेक्षा माफक दरात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी देण्यात आलेला आहे)

- विम्याचा हप्ता (14.5% सेवा करासहित ) खालील प्रमाणे राहील पण सेवा कराची टक्केवारी बदलल्यास विमा हफ्ता ही बदलेल.

| | रु 1 लाखा करीता विमा हफ्ता रक्कम रु | रु 2 लाखा करीता विमा हफ्ता रक्कम रु | रु 3 लाखा करीता विमा हफ्ता रक्कम रु |
|---|---|---|---|
| एक हज़ार पेक्षा जास्त सेवानिवृत्त कर्मचारी असल्यास | 6562 | 12664 | 18234 |
| दोन हज़ार पेक्षा जास्त सेवानिवृत्त कर्मचारी असल्यास | 5906 | 11397 | 16411 |

- सदर योजने अंतर्गत पॉलिसी ची रक्कम रु.1 लाख/2 लाख/3 लाख पर्यंत मर्यादित असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांच्या आवश्यकते नुसार पॉलिसी ची निवड करायची आहे. यासाठी https://msebretired.mdindia.com:82/ या संकेत स्थळावर जाऊन आपले रजिस्ट्रेशन करावे.

दि ओरिएण्टल इंश्योरेंस कंपनी लि.
The Oriental Insurance Co. Ltd.
मं.का. III
D.O.-III
163500
Pune
पुणे

- आवश्यक त्या रकमेची निवड केल्यानंतर संगणकावरील बटन दाबताच जो रजिस्ट्रेशन नंबर दिसेल त्याची स्वतः जवळ नोंद ठेवावी. रजिस्ट्रेशनचा कालावधी दिनांक 15 मे ते 15 जून 2016 हा राहील.
- वरील योजनेसाठी किमान 1 हज़ार पेक्षा जास्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सहभागासाठी विकल्प सादर करून, विमा रकमेचा भरणा केल्यानंतरच दि ओरिएंटल इन्शुरेंस कंपनी लिमिटेड पुणे, यांच्या मार्फत सदर योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे.
- तसेच सदर योजने अंतर्गत किमान 1 हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजिस्ट्रेशन झाल्यावर विमा हप्ता भरण्यासाठी बैंक अकाउंट नंबर देण्यात येईल. त्यामध्ये 16 जून ते 30 जून 2016 या कालावधीत इच्छुक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी हप्ता भरल्यानंतर पॉलिसी 1 जुलै 2016 पासून अंमलात येईल.

या योजनेस जास्तीत जास्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी वरील वेळापत्रकानुसार प्रतिसाद द्यावा जेणेकरून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी ही पॉलिसी आम्हाला यशस्वीरित्या राबवता येईल.

काही शंका असल्यास वरील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
आपल्या त्वरित प्रतिसादाची अपेक्षा आहे.

केतकी सिंदेकर
डिविजल मॅनेजर
पुणे डिवीजन 3

दि ओरिएण्टल इंश्योरेंस कम्पनी लि.
The Oriental Insurance Co. Ltd.
मं.का. III
D.O.-III
163500
Pune
पुणे